राज्यातील सहकारी सूतगिरण्यांची प्रकल्प अहवाल किंमत सुधारित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्र.प्रकल्प- १२२६/प्र.क्र.२८/टेक्स-१ (अ)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ ऑक्टोबर, २०२६

**वाचा :-**

१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. सूतगि ११०८/प्र.क्र.९१/टेक्स १ (अ), दि.२५ नोव्हेंबर, २०१०.
२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. सूतगि ११०८/प्र.क्र.९१/टेक्स १ (अ), दि.३० जून, २०११.
३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. सूतगि ११०८/प्र.क्र.९१/टेक्स १ (अ), दि.३० जुलै, २०१४.
४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. प्रकल्प- १२१५/प्र.क्र.५०/टेक्स-१ (अ), दि.१७ जून, २०२१.

**प्रस्तावना :-**

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या वरील संदर्भ क्र.३ मधील दि. ३० जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सहकारी सूतगिरण्यांची सुधारित प्रकल्प अहवाल किंमत निश्चित करणे व प्रकल्प किंमतीसंदर्भात निकष / धोरण निर्धारित करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या संदर्भ क्र.४ येथील दि.१७ जुन, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सहकारी सूतगिरण्यांची प्रकल्प किंमत रु.८०.९० कोटी इतकी निश्चित करण्यात आली आहे. जमीनीच्या भावात झालेली वाढ, बांधकाम खर्चामध्ये व यंत्रसामुग्रीच्या किंमतीमध्ये झालेली वाढ विचारात घेऊन, राज्यातील सहकारी सूतगिरण्यांकडून प्रकल्प किंमतीत वाढ करण्यात येत असलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, राज्यातील लोकप्रतीनिधी व महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई यांनी सूतगिरणीची प्रकल्प किंमत सुधारित करण्याची विनंती केलेली होती. त्यानुषंगाने, सहकारी सूतगिरण्यांची प्रकल्प किंमत सुधारित करण्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील गठीत समितीसमोर दि. २३ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार राज्यातील सहकारी सूतगिरण्यांची प्रकल्प किंमत सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने घेतलेल्या निर्णयानुसार सन २०२२-२३ च्या डी.एस.आर. प्रमाणे सहकारी सूतगिरणीची प्रकल्प किंमत रु.११८.०० कोटी इतकी निश्चित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. यासंदर्भात बाबनिहाय खर्चाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | तपशिल | सुधारित किंमत (रु. लाखात) |
|---|---|---|
| १ | जमीन व जमीन सुधारणा | ३१५.५९ |
| २ | फॅक्टरी इमारत | २५६५.२७ |
| ३ | यंत्रसामुग्री | ५९९८.०३ |
| ४ | इतर कायम मालमत्ता | ११६२.०५ |
| ५ | स्टोअर्स ॲण्ड स्पेअर्स | ११२.३५ |
| ६ | उत्पादन पूर्व खर्च | ५८०.०५ |
| ७ | आकस्मिक खर्च (Contingency) | ४८६.२७ |
| ८ | खेळते भांडवल | ५८०.३८ |
| | **एकूण** | **११८००.००** |

२. शासन निर्णय दिनांक १७ जून, २०२१ नुसार ज्या सहकारी सूतगिरण्यांचे मूळ प्रकल्प किंमत निश्चित करण्यात आलेली आहे, तथापि सूतगिरण्यांचे प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु झालेले नाहीत, अशा सूतगिरण्यांना देखील प्रो-रेटा पध्दतीने सदर रु.११८.०० कोटी ही सुधारित प्रकल्प किंमत लागू करण्यात येत आहे. याबाबत सदर सहकारी सूतगिरण्यांचे प्रकरणनिहाय प्रस्ताव त्यांनी पूर्ण केलेल्या शिर्षकनिहाय कामाच्या संदर्भात प्रो-रेटा पध्दतीने खर्चाची निश्चिती करुन आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी शासनास सादर करावे, जेणेकरुन शासन निर्णय क्र. सूतगि-१२००/प्र.क्र.१५३/टेक्स १ (अ), दि. १३ जून, २००० अन्वये मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत सुकाणू समितीकडून याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१२१७०८१८१६३६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKRISHNA BABURAO PAWAR

Digitally signed by SHRIKRISHNA BABURAO PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=631cf5e4544a7032340c686106b15138df3ef3b889e86fb2026c1add12d27e41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2FAFF40BB05D156355556F7264A3A59AD12DD42F183422309976C41CE28C0A1D, cn=SHRIKRISHNA BABURAO PAWAR
Date: 2026.10.12 17:09:46 +05'30'

**(श्रीकृष्ण पवार)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अ. मु. स., मंत्रालय, मुंबई

२) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई.

३) मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शा) यांचे यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.

५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

६) अपर मुख्य सचिव (नियोजन), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

७) अपर मुख्य सचिव (वित्त), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

८) अपर मुख्य सचिव (उद्योग), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

९) प्रधान मुख्य सचिव (सा.बां.वि.), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

१०) सचिव (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

११) सचिव / प्रधान सचिव / अ.मु.स. (सामाजिक न्याय / इतरमागास व बहुजन कल्याण/ आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई.

१२) आयुक्त, वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर-४४० ००१

१३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ., मुंबई -०१.

१३) निवडनस्ती (कार्यासन टेक्स १ (अ) व टेक्स १(ब)).